सुटीच्या दिवशीही वाजणार 'नोंदणी'चा चौघडा

मुंबई, दि. २० : प्रतिनिधी

नवे घर किंवा जमीन खरेदी करणाऱ्यांसाठी आणि मार्च अखेरच्या धावपळीत मुद्रांक शुल्काची प्रक्रिया पूर्ण करू इच्छिणाऱ्यांसाठी एक अत्यंत महत्त्वाची बातमी समोर आली आहे. आर्थिक वर्षाचा शेवट आणि नवीन वर्षाच्या मुहूर्तावर होणारी मालमत्ता व्यवहारांची गर्दी लक्षात घेता, राज्य सरकारने सार्वजनिक सुट्यांच्या दिवशीही 'दुय्यम निबंधक' कार्यालये सुरू ठेवण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. यामुळे आता सुटीच्या दिवशीही दस्त नोंदणीचा मार्ग मोकळा झाला आहे.

नोंदणी व मुद्रांक विभागाने जारी केलेल्या पत्रकानुसार, २६, २८, २९ आणि ३१ मार्च २०२६ या चारही दिवशी—जेव्हा एरवी सार्वजनिक किंवा साप्ताहिक सुट्या असतात—राज्यातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालये पूर्णवेळ कार्यरत राहतील. महसूल वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आणि नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाने हा 'मार्च धमाका' प्लॅन आखला आहे. केवळ निबंधक कार्यालयेच नव्हे, तर त्यांच्यावर देखरेख ठेवणारी सह जिल्हा निबंधक आणि मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालयेदेखील या काळात उघडी राहणार आहेत.

नोंदणी उपमहानिरीक्षक उदयराज चव्हाण यांनी स्पष्ट केले आहे की, अभिलेख अद्ययावत करणे आणि मुद्रांक शुल्क वसुलीची कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. गुढीपाडवा आणि नवीन वर्षाच्या पार्श्वभूमीवर मालमत्ता खरेदी-विक्रीला मोठी गती मिळते, अशा वेळी ही अतिरिक्त सेवा सर्वसामान्यांसाठी दिलासादायक ठरणार आहे. त्यामुळे, ज्यांचे दस्तऐवज प्रलंबित आहेत किंवा ज्यांना मार्च संपण्यापूर्वी व्यवहार पूर्ण करायचे आहेत, त्यांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

जुने फर्निचर विकत घेण्याच्या बहाण्याने अडीच लाखांची फसवणूक

मुंबई, दि. २० : प्रतिनिधी

सांकेतिक छायाचित्र

घरातील नको असलेले फर्निचर विकणाऱ्या व्यक्तीला अज्ञात व्यक्तीने तब्बल २.५० लाख रुपयांना गंडा घातल्याचा प्रकार मुलुंड परिसरात घडला. या प्रकरणी नवघर पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. मुलुंडमधील नीलम नगर परिसरात वास्तव्यास असेलेले कुमारन नटराजन (५७) यांच्या घरी एक जुना सोफा होता. या सोफ्याचा काहीही उपयोग होत नसल्याने त्यांनी तो विकण्याचा निर्णय घेतला. जुने समान खरेदी – विक्रीचे व्यवहार होत असलेल्या 'ओएलएक्स' या समाजमाध्यमांवर त्यांनी सोफ्याची छायाचित्रे टाकली. त्यानंतर काही वेळातच त्यांना एका अनोळखी व्यक्तीने मोबाइलवर संपर्क साधला आणि सोफा विकत घेण्याची इच्छा व्यक्त केली. उभयतांमध्ये व्यवहार निश्चित करण्यात आला. सदर सोफा ५० हजार रुपयांना खरेदी करण्याचे अज्ञात व्यक्तीने निश्चित केले. दुसऱ्याच दिवशी अज्ञात इसमाने नटराजन यांना फोन केला आणि ऑनलाईन पैसे पाठवण्यासाठी त्यांचा नंबर मागितला. नटराजन यांनी नंबर दिल्यानंतर आरोपीने पैसे पाठवल्याचा बनाव केला. मात्र नटराजन यांच्या बँक खात्यात पैसे जमा झाले नाहीत. त्यामुळे आरोपीने स्वतःच्या खात्यात शंभर रुपये पाठवण्यास तक्रारदारांना सांगितले. तक्रारदाराने आरोपीला १०० रुपये पाठवले. आरोपीने हे १०० रुपये त्यांच्या खात्यात परत पाठवले. आरोपीने नटराजन यांचा विश्वास संपादन करत २५ हजार, ५० हजार रुपये पाठवण्यास सांगून नटराजन यांच्या खात्यातून २ लाख ४० हजार रुपये काढून घेतले. मात्र त्यांना हे पैसे परत पाठवलेच नाहीत. त्यानंतर आरोपीचा मोबाइल बंद झाला. अखेर आपली फसवणूक झाल्याचे नटराजन यांच्या लक्षात आले. अखेर त्यांनी नवघर पोलिस ठाण्यात धाव घेतली आणि तक्रार दाखल केली.

मुंबईत दुचाकी वाहनांसाठी 'MH01FH' नवीन नोंदणी मालिकेची सुरुवात

मुंबई, दि. २० : प्रतिनिधी

प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य) येथे दुचाकी व चारचाकी वाहनांची नोंदणी केली जाते. सध्या दुचाकी खासगी परिवहनेत्तर (2W NT) वाहनांसाठी वापरात असलेली 'MH01FG' ही नोंदणी मालिका पूर्ण झाल्याने आता 'MH01FH' ही नवीन मालिका सुरू करण्यात येत असल्याची माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी निखील साळुंखे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

महाराष्ट्र मोटार वाहन नियम 1989 मधील सुधारित नियम 54 (अ) नुसार वाहनधारकांना पसंतीचे किंवा आकर्षक नोंदणी क्रमांक आगाऊ शुल्क भरून आरक्षित करण्याची सुविधा उपलब्ध आहे. यासाठी कार्यालयाने निश्चित केलेल्या नमुन्यात अर्ज सादर करावा लागतो. आरक्षित केलेल्या वाहन क्रमांकाची वैधता 180 दिवसांपर्यंत असते आणि या कालावधीत त्या क्रमांकावर वाहनाची नोंदणी करणे आवश्यक आहे.

वाहन क्रमांक आरक्षित करण्यासाठी कार्यालयाच्या खिडकी क्रमांक ई 18 येथे अर्ज उपलब्ध असून मार्गदर्शनासाठी कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. आरक्षणाची नोंद 'वाहन-04' प्रणालीमध्ये केल्यानंतर संबंधित वाहनास आरक्षित क्रमांक दिला जातो.

वाहन क्रमांक आरक्षित करण्यासाठी फोटो ओळखपत्र, निवासाचा पुरावा, पॅनकार्ड आणि वाहन खरेदीची पावती ही कागदपत्रे आवश्यक आहेत.

नवीन 'MH01FH' मालिकेतील पसंतीचा क्रमांक मिळविण्यासाठी इच्छुक वाहनधारकांनी सोमवार, 23 मार्च 2026 रोजी दुपारी 12 वाजेपर्यंत कार्यालयाच्या खिडकी क्रमांक ई-18 येथे अर्ज व शुल्क जमा करावे. एकाच क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास त्याच दिवशी दुपारी 2 वाजता लिलाव पद्धतीने क्रमांक वितरित करण्यात येणार आहे.

वाहनधारकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (मध्य) यांच्या वतीने करण्यात आले आहे.

एसटीची आर्थिक घडी मजबूत करण्यासाठी बहुआयामी उपाययोजना - परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

मुंबई, दि. २० : प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची (एसटी) आर्थिक स्थिती सक्षम करण्यासाठी पर्यायी उत्पन्न स्रोत निर्माण करण्याबरोबरच खर्च नियंत्रणासाठी ठोस व दूरदृष्टीपूर्ण निर्णय घेतले जात असल्याची माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी पत्रकार परिषदेद्वारे दिली. डिझेल खरेदीची निविदा प्रक्रिया कोणताही हस्तक्षेप सहन न करता पारदर्शक पद्धतीने राबविल्यामुळे केवळ डिझेल खरेदीतून दरवर्षी सुमारे 241 कोटी रुपयांची बचत होणार असल्याचे त्यांनी सांगितले. मंत्री सरनाईक म्हणाले की, सध्या एसटी महामंडळावर सुमारे 12 हजार कोटी रुपयांचा संचित तोटा आहे. चालू आर्थिक वर्षातही फेब्रुवारी 2026 अखेर सुमारे 750 कोटी रुपयांचा तोटा सहन करावा लागला आहे. दररोज एसटीच्या उत्पन्नापेक्षा 1 ते 2 कोटी रुपये अधिक खर्च होत असल्याने केवळ तिकीट विक्रीवर अवलंबून राहणे शक्य नाही. त्यामुळे पर्यायी उत्पन्न स्रोत निर्माण करणे ही काळाची गरज बनली आहे. चालू आर्थिक वर्षात डिझेल बचतीबरोबरच जाहिरातीतून सुमारे 250 कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे.

डिझेल खरेदी प्रक्रियेविषयी माहिती देताना मंत्री सरनाईक म्हणाले की, यापूर्वी अनेक वर्षे ठराविक सवलतीवर डिझेल खरेदी केली जात होती. मात्र स्पर्धात्मक निविदा प्रक्रियेद्वारे अधिक सवलत मिळवण्याच्या उद्देशाने ही प्रक्रिया राबविण्यात आली. ही प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक, नियमबद्ध आणि निष्पक्ष पद्धतीने पार पडली असून कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप सहन केला जाणार नाही, अशी आमची ठाम भूमिका असल्याचेही त्यांनी सांगितले.

सध्या एसटीला दररोज सुमारे 10.87 लाख लिटर डिझेलची आवश्यकता असून वर्षाकाठी सुमारे 40 कोटी लिटर डिझेल खरेदी केली जाते. यासाठी दरवर्षी सुमारे 3,400 कोटी रुपये खर्च होतो. भविष्यात 8 हजार नवीन डिझेल बसेस ताफ्यात दाखल झाल्यानंतर हा खर्च सुमारे 4,700 कोटी रुपयांपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. यापूर्वी प्रति लिटर सुमारे 2.70 रुपयांची सवलत मिळत होती, ती वाढवून ३ रुपये करण्यात आली होती. मात्र स्पर्धात्मक निविदेनंतर प्रति लिटर 5.13 रुपयांची सवलत मिळाली असून ही सध्याच्या दरापेक्षा 2.13 रुपयांनी अधिक आहे. या निर्णयामुळे एसटी महामंडळाला दरवर्षी सुमारे 240 ते 241 कोटी रुपयांची बचत अपेक्षित आहे.

एसटीच्या महसूलवाढीसाठी इंधन विक्री क्षेत्रातही महामंडळ प्रवेश करत आहे. डिझेल, पेट्रोल, सीएनजी, एलएनजी तसेच भविष्यात इलेक्ट्रिक वाहनांसाठी चार्जिंग सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर 100 ते 110 ठिकाणी मल्टी-मोडल इंधन पंप उभारण्याची प्रक्रिया सुरू आहे. या उपक्रमातून दरवर्षी सुमारे 100 कोटी रुपयांचे उत्पन्न अपेक्षित आहे. धुळे येथे अशा प्रकारचा प्रकल्प आधीच कार्यान्वित करण्यात आला आहे.

इंधन गळती रोखण्यासाठी तसेच इंधन भरण्यातील अनियमितता टाळण्यासाठी एसटीच्या प्रत्येक पंपावर इंधन टाकी व नोझलला कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित सेन्सर बसविण्यात येणार असल्याची माहिती मंत्री सरनाईक यांनी दिली. सध्याच्या पारंपरिक पद्धतीमुळे दर 100 लिटरमागे चार ते पाच लिटर तूट होत असल्याची बाब समोर आल्याने ही उपाययोजना करण्यात येत आहे.

जाहिरात महसूल वाढवण्यासाठीही मोठा निर्णय घेण्यात आला आहे. एसटीच्या 251 आगारांद्वारे आणि 600 हून अधिक बसस्थानकांद्वारे दररोज 50 ते 55 लाख प्रवाशांपर्यंत पोहोचणाऱ्या या माध्यमाचा प्रभावी वापर करण्यात येणार आहे. बसेसच्या आतील व बाहेरील भाग, बसस्थानके तसेच परिसरात डिजिटल फलक, उद्घोषणा आदींच्या माध्यमातून जाहिरात करून पुढील पाच वर्षांत सुमारे 250 कोटी रुपयांचे उत्पन्न मिळवण्याचा आराखडा तयार करण्यात आला आहे. यापूर्वी हे उत्पन्न दरवर्षी केवळ 20 ते 22 कोटी रुपये होते.

ऊर्जा बचतीसाठी एसटी महामंडळाने सौर रूफटॉप प्रकल्प हाती घेतला आहे. विविध आगार, बसस्थानके आणि कार्यशाळांच्या छतांवर सौर प्रकल्प उभारून वीज निर्मिती करण्यात येणार आहे. स्थानिक गरज भागवून उर्वरित वीज विक्रीतून दरवर्षी 10 ते 15 कोटी रुपयांची बचत व उत्पन्न मिळणार आहे. तसेच एसटीच्या मोकळ्या जागेवर सौर शेतीद्वारे वीज निर्मिती करून ती महावितरण कंपनीला विकण्यात येणार असून त्यातून शाश्वत उत्पन्न निर्माण होईल, असे मंत्री सरनाईक म्हणाले.

"एसटीमध्ये आर्थिक शिस्त, पारदर्शकता आणि स्वावलंबन वाढवणे हे आमचे उद्दिष्ट आहे. पर्यायी उत्पन्न स्रोत निर्माण करून एसटीला सक्षम व टिकाऊ बनवण्याचा आमचा निर्धार आहे," असे सांगून मंत्री प्रताप सरनाईक पुढे म्हणाले की, पुढील आर्थिक वर्षात स्क्रॅपिंग प्रकल्प, चालक-वाहकांच्या ड्युटीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करून अतिकालीन भत्त्यावर नियंत्रण, तसेच इतर उपाययोजना राबवून किमान 500 कोटी रुपयांचे अतिरिक्त उत्पन्न मिळवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

नियत आणि नियोजनः शेगाव आणि शिर्डी देवस्थानच्या व्यवस्थापनाचा आरसा

मुंबई, दि. २० : प्रतिनिधी

"भक्त सेवा हीच खरी ईश्वर सेवा" असे मानणाऱ्या भारतीय संस्कृतीत मंदिरांकडे केवळ धार्मिक केंद्रे म्हणून नव्हे, तर भक्तांच्या विश्वासाचे आणि आशेचे केंद्र म्हणून पाहिले जाते. मात्र, अलीकडेच टीव्हीवर झळकलेल्या दोन बातम्यांनी मंदिर व्यवस्थापनातील 'नियत आणि नियोजन' यातील दरी स्पष्टपणे अधोरेखित केली आहे. एकीकडे अफाट उत्पन्न असूनही 'गॅस टंचाई'चे कारण देत लाडू प्रसादात कपात करणारे शिर्डी संस्थान, तर दुसरीकडे त्याच परिस्थितीत सौर ऊर्जेचा (Solar Energy) कल्पक वापर करून अविरत महाप्रसाद वाटप करणारे शेगावचे श्री गजानन महाराज संस्थान; हा विरोधाभास आज विचार करायला लावणारा आहे.

आकडेवारीवर नजर टाकली तर हा फरक अधिक गंभीर वाटतो. शिर्डी संस्थानचे वार्षिक उत्पन्न साधारण ९०० कोटी रुपयांच्या आसपास आहे, तर शेगाव संस्थानचे उत्पन्न केवळ १५० कोटी रुपये आहे. उत्पन्नाच्या बाबतीत शिर्डी संस्थान अनेक पटींनी मोठे असूनही, व्यवस्थापन, पारदर्शकता आणि दूरदृष्टीच्या बाबतीत अनेक भाविकांना शेगावचा अनुभव अधिक समाधानकारक वाटतो. यावरून एक गोष्ट स्पष्ट होते की, देवस्थानाचे वैभव त्याच्या तिजोरीतील सोन्या-चांदीवर नाही, तर ते चालवणाऱ्या संचालक मंडळाच्या निस्वार्थी वृत्तीवर अवलंबून असते.

शेगावच्या व्यवस्थापनाचा सर्वात मोठा पुरावा म्हणजे तिथले 'हायटेक' पार्किंग. मुंबई-दिल्लीसारख्या महानगरांनाही लाजवेल अशी ही व्यवस्था आहे. एकमेकांच्या विरुद्ध २५ पार्किंग लेन, रिकाम्या जागेची माहिती देणारे डिजिटल डिस्प्ले आणि येण्या-जाण्याचे स्वतंत्र मार्ग—ही संपूर्ण शिस्तबद्ध व्यवस्था भाविकांसाठी पूर्णपणे मोफत आहे. याउलट, शिर्डीत पोहोचताच भाविकांना खाजगी पार्किंगवाल्यांच्या विळख्याला सामोरे जावे लागते, जिथे एका तासाचे २०० रुपये किंवा त्याहून अधिक पैसे उकळले जातात. श्रद्धेने आलेल्या भक्तांची अशी लूट होणे हे दुर्दैवी आहे.

शिवाय, रेल्वे स्टेशन आणि बस स्थानकापासून मंदिरापर्यंत शेगाव संस्थानने सुरू केलेली मोफत बस सेवा वृद्ध आणि महिलांसाठी मोठा आधार ठरली आहे. शिर्डीसारख्या श्रीमंत देवस्थानाने अशा सेवाभावी योजना राबवणे अपेक्षित असताना तिथे मात्र भाविकांना अनेकदा खासगी वाहतूकदारांच्या दयेवर अवलंबून राहावे लागते.

शेगावच्या भक्तनिवासात पाऊल ठेवले की तिथली स्वच्छता पाहून कोणालाही ते युरोपमधील एखादे ठिकाण असल्याचा भास होतो. अत्यंत माफक दरात मिळणाऱ्या स्वच्छ खोल्या आणि कर्मचाऱ्यांची नम्रता पंचतारांकित हॉटेललाही मागे टाकते. याउलट शिर्डीत सामान्य भक्ताला निवास मिळवताना अनेकदा राजकीय शिफारसी किंवा ओळखीचा आधार घ्यावा लागतो, ज्यामुळे दर्शनाची ओढ घेऊन आलेल्या भाविकांचा अनुभव कडू होतो.

शेगाव संस्थानची आणखी एक मोठी ताकद म्हणजे तिथली सामाजिक शिस्त. मंदिर परिसरात भिकाऱ्यांची गर्दी नसते की कोणी भक्तांकडे हट्टाने दान मागत नाही. भाविकांनी दिलेला पै न पै हा समाजकार्यासाठी वापरला जातो. शेगाव संस्थानने उभारलेली मेडिकल आणि इंजिनिअरिंग कॉलेजेस, शैक्षणिक संस्था आणि लोकसेवा प्रकल्प हे याचे जिवंत उदाहरण आहेत. जेव्हा संचालक मंडळ निस्वार्थी असते, तेव्हा 'गॅस टंचाई'सारख्या समस्यांवर सौर ऊर्जेसारखे शाश्वत उपाय शोधले जातात, प्रसादात कपात केली जात नाही.

शेगाव संस्थानचे स्वयंपूर्ण आणि पारदर्शक मॉडेल आज भारतातील प्रत्येक मोठ्या देवस्थानासाठी एक दीपस्तंभ आहे. देवस्थानाचे संचालन करणाऱ्या मंडळांनी हे लक्षात घ्यायला हवे की, मंदिर हे केवळ देवाचे घर नसून ते भक्तांच्या विश्वासाचे केंद्र आहे. भक्तांना दिला जाणारा सन्मान, सोयी आणि व्यवस्थेतील प्रामाणिकपणा हेच खऱ्या अर्थाने देवस्थानाचे यश आहे. शिर्डीसह देशातील सर्व मंदिर समित्यांनी शेगावचा हा 'नियत आणि नियोजना'चा आदर्श स्वीकारला, तरच खऱ्या अर्थाने ईश्वर सेवा साध्य होईल.

वडापावही महागला

मुंबई, दि. २० : प्रतिनिधी

मुंबई-ठाणेकरांच्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग असलेला आणि सर्वसामान्यांचा पोटभरणारा वडापाव आता सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जात असल्याचे चित्र दिसत आहे. एकेकाळी पाच रुपयांत मिळणारा वडापाव सध्या २५ ते ३० रुपयांपर्यंत पोहोचला असून, इतर नाश्त्यांच्या दरातही वाढ झाल्याने नागरिकांच्या खिशाला चांगलीच झळ बसत आहे. इराण-इस्रायल संघर्ष यामुळे निर्माण झालेल्या तणावाचा परिणाम अनेक दिवसांपासून इंधन पुरवठ्यावर झाला आहे. गॅस टंचाई निर्माण झाल्याने तसेच सिलेंडरच्या दरात वाढ झाल्याने छोट्या खानावळी आणि हॉटेल व्यवसायिकांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. ठाण्यातील सुमारे ६० टक्के हॉटेल्स तात्पुरती बंद असल्याची माहिती समोर येत आहे. गॅसअभावी अनेक विक्रेत्यांना पारंपरिक चुलीवर वडे तळावे लागत आहेत. मात्र, चुलीसाठी लागणाऱ्या लाकडांचे दरही वाढल्याने खर्चात आणखी भर पडत आहे. त्यातच खाद्यतेलाच्या दरात ३० ते ४० रुपयांनी वाढ झाली असून बेसन, बटाटा आणि इतर कच्च्या मालाच्या किंमतीही वाढल्या आहेत. परिणामी, व्यवसाय तोट्यात जात असल्याने विक्रेत्यांना वडापावच्या किंमती वाढविण्याचा निर्णय घ्यावा लागला आहे. याशिवाय, पाव तयार करणाऱ्या बेकऱ्यांनाही गॅस टंचाईचा फटका बसत आहे. अनेक बेकऱ्या बंद पडल्याने पावाचा पुरवठा कमी झाला असून दर वाढले आहेत. काही ठिकाणी कोळशावर चालणाऱ्या बेकऱ्यांवरच सध्या अवलंबून राहावे लागत आहे. वाढत्या खर्चामुळे विक्रेत्यांना पदार्थांची विविधता कमी करावी लागत आहे. पूर्वी सहज उपलब्ध असणारे कांदा भजी, मुगडाळ भजी, बटाटा भजी यांसारखे पर्याय आता कमी झाले असून बहुतांश विक्रेते फक्त वडापाव वरच भर देत आहेत. त्यामुळे ग्राहकांनाही पर्याय कमी मिळत आहेत. दरम्यान, वडापाव हा कष्टकरी, कामगार आणि प्रवाशांसाठी स्वस्त व झटपट पोटभरणारा पर्याय म्हणून ओळखला जातो. मात्र वाढत्या महागाईमुळे हा 'गरीबांचा फास्ट फूड'ही महाग होत चालल्याने सर्वसामान्यांच्या अडचणी वाढल्या आहेत.

जाहीर नोटीस

या नोटीस द्वारे जाहीर करण्यात येते की, श्री. दिनकर हरिबा शिंदे, यांना गिरणी संकेत क्र– ३० – सेंच्युरी मिल (Century Mill) प्राधान्य क्र. १६१/६७७, गाळा क्र. २,D,३,३०५ सदर सदनिका म्हाडा गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्यावतीने दिनांक: १८/०१/२०१९ रोजी वितरीत करण्यात आले होते, परंतु श्री. दिनकर हरिबा शिंदे यांचे दिनांक १२/०२/२००९ रोजी निधन झाले असून त्यांच्या नंतर त्यांची पत्नी श्रीमती मुक्ताबाई दिनकर शिंदे यांचे दिनांक १५/०७/२०२१ रोजी निधन झाले असून त्यांच्या पश्चात वारसदारांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

१) रामचंद्र दिनकर शिंदे – मुलगा वय: ५९ वर्षे
२) दत्तात्रय दिनकर शिंदे – मुलगा वय: ४७ वर्षे
३) अंजना भानुदास पवार – मुलगी वय: ५७ वर्षे

सेंच्युरी मिल (Century Mill) लिमिटेड यांचा कडून कामगारांच्या वारसांना लाभ मिळण्यासाठी मला वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे, तरी ज्या कोणाची वारस हक्काबद्दल काहीही आक्षेप असतील तर त्यांनी कायदेशीर पुराव्यासह ती नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत तहसिलदार कार्यालय एफ नॉर्थ विभाग (F North Ward) जिल्हा दंडाधिकारी शाखा जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई –४००००१ यांच्याशी संपर्क साधावा.

सही/–
रामचंद्र दिनकर शिंदे

जाहीर नोटीस

या नोटीस द्वारे जाहीर करण्यात येते की, श्री. अशोक गोपाल दाभोळकर, यांना गिरणी संकेत क्र– ३० – सेंच्युरी मिल (Century Mill) प्राधान्य क्र. ७२/५२३, गाळा क्र. २,A,२,२१२ सदर सदनिका म्हाडा गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्यावतीने दिनांक: १८/०१/२०१९ रोजी वितरीत करण्यात आले होते, परंतु श्री. अशोक गोपाल दाभोलकर यांचे दिनांक १२/०२/२००९ रोजी निधन झाले असून त्यांच्या पश्चात वारसदारांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

१) कौत्सुभ अशोक दाभोलकर – मुलगा वय: ३४ वर्षे
२) अनघा अशोक दाभोलकर – पत्नी वय: ६३ वर्षे
३) गौरी योगेश पवार – मुलगी वय: २८ वर्षे

सेंच्युरी टेक्सटाईल्स एण्ड इण्डस्ट्रीज लिमिटेड यांचा कडून कामगारांच्या वारसांना लाभ मिळण्यासाठी मला वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे, तरी ज्या कोणाची वारस हक्काबद्दल काहीही आक्षेप असतील तर त्यांनी कायदेशीर पुराव्यासह ती नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत तहसिलदार कार्यालय एफ नॉर्थ विभाग (F North) Ward दंडाधिकारी शाखा जिल्हा शहीद भगतसिंग मार्ग, जुने जकात घर, फोर्ट, मुंबई – ४००००१ यांच्याशी संपर्क साधावा.

सही/–
कौत्सुभ अशोक दाभोलकर

रतन टाटांच्या नावाने राज्याच्या तरुणाईला मिळणार 'कौशल्याची' दीक्षा

उपराष्ट्रपतींच्या उपस्थितीत ऐतिहासिक सोहळ्याची पडघम

मुंबई, दि. २० : प्रतिनिधी

महाराष्ट्रातील तरुणांच्या हाताला केवळ काम नाही, तर जागतिक दर्जाचे कौशल्य मिळवून देण्याच्या मोहिमेतील एक सुवर्णक्षण उद्या, २१ मार्च २०२६ रोजी अनुभवायला मिळणार आहे. 'रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठा'चा पहिला दीक्षांत सोहळा मुंबईतील लोकभवन येथील दरबार हॉलमध्ये दुपारी २ वाजता रंगणार आहे. या दिमाखदार सोहळ्याला देशाचे उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असल्याची माहिती कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

हे विद्यापीठ केवळ पदव्या देणारे केंद्र नसून, टाटांच्या नावाला साजेसे उद्योगाभिमुख शिक्षण देणारे 'हब' बनले आहे. या सोहळ्याला राज्यपाल जिष्णु देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांसारख्या दिग्गज नेत्यांची मांदियाळी असणार आहे. मंत्री लोढा यांनी सांगितले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या कौशल्य विकासाच्या स्वप्नाला गती देण्यासाठी हे विद्यापीठ कार्यरत आहे. विशेष म्हणजे, मायक्रोसॉफ्ट आणि किर्लोस्कर यांसारख्या जागतिक कंपन्यांशी या विद्यापीठाने हातमिळवणी केली असून, थेट आंतरराष्ट्रीय स्तरावरील नोकऱ्यांच्या संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या आहेत.

दीक्षांत सोहळ्याचे आणखी एक आकर्षण म्हणजे 'जयंत सहस्रबुद्धे कौशल्याधारित प्रदर्शन'. भारतीय विज्ञान आणि तंत्रज्ञानासाठी जीवन अर्पण करणाऱ्या सहस्रबुद्धे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ हे प्रदर्शन भरवण्यात आले आहे. यामध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजनेतील यशस्वी तरुणींचे उपक्रम आणि टोयोटा, हिंदुस्थान एरोनॉटिक्स यांसारख्या १२ नामांकित कंपन्यांचे स्टॉल्स पाहायला मिळतील. आध्यात्मिक गुरु श्री श्री रविशंकर यांच्या रूरल डेव्हलपमेंट ट्रस्टचाही यात सहभाग असणार आहे.

जुलै २०२२ मध्ये स्थापन झालेल्या या विद्यापीठाची भव्य इमारत आता पनवेलमध्ये उभी राहत असून, पुणे, ठाणे, नागपूर यांसारख्या शहरांमध्येही याची केंद्रे विस्तारली आहेत. आधुनिक तंत्रज्ञान आणि रोजगाराची हमी देणारा हा दीक्षांत सोहळा महाराष्ट्राच्या शैक्षणिक आणि औद्योगिक क्रांतीचा एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे.

मध्य पूर्वेतील युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर वैमानिक आणि प्रवाशांच्या सुरक्षेसाठी विशेष विम्याची मागणी

मुंबई, दि. २० : प्रतिनिधी

सर्व विमान कर्मचारी आणि प्रवाशांसाठी सर्वसमावेशक युद्ध-जोखीम विमा अनिवार्य करण्याची मागणी एअरलाइन पायलट्स असोसिएशन ऑफ इंडियाने (अल्पा-इंडिया) नागरी हवाई वाहतूक महासंचालनालयाकडे (डीजीसीए) केली आहे. मध्य पूर्व आणि पश्चिम आशियातील वाढत्या तणावामुळे मध्यम आणि लांब पल्ल्याच्या विमान उड्डाणांच्या संचालनातील वाढत्या जोखमीच्या पार्श्वभूमीवर ही मागणी करण्यात आली आहे.

अल्पा-इंडियाने बुधवारी डीजीसीएला पाठविलेल्या पत्रात, प्रमाणित विमानचालन विम्यातून वळगलेल्या युद्धाच्या जोखमीच्या गंभीर त्रुटीवर प्रकाश टाकला. जुन्या विमा योजनेत संघर्ष क्षेत्रांमध्ये घडणाऱ्या घटनांचा समावेश नाही. ज्यामुळे लष्करी कारवाई किंवा अपघाती चकमकींच्या प्रसंगी कर्मचारी आणि प्रवासी असुरक्षित राहतात. डीजीसीएने एअर इंडियासाठी उड्डाण कर्तव्य वेळ मर्यादा नियमांमध्ये दिलेल्या शिथिलतेवरून निर्माण झालेल्या वाढत्या वादाच्या पार्श्वभूमीवर विम्याची मागणी होत आहे.

इराणी आणि इराकी हवाई क्षेत्राभोवती विमानांचे मार्ग बदलल्यामुळे, बोईंग ७८७ विमानांवरील काही लांब पल्ल्याची उड्डाण वेळ आता केवळ दोन वैमानिकांसह ११ तास ३० मिनिटांपर्यंत वाढली आहे. अपघाती घटनांचा धोका कमी करण्यासाठी, उड्डाणाचा वेळ, गंतव्यस्थान इत्यादींसह विमानाची माहिती आखाती प्राधिकरणांना कळवली जाते का, अशी विचारणाही अल्पा-इंडियाने डीजीसीएकडे केली आहे.

अल्पा-इंडियाचे अध्यक्ष कॅप्टन सॅम थॉमस यांनी युद्धाच्या काळात सामान्यतः लागू होणाऱ्या मानक अपवादांना रद्द करण्यासाठी, सर्व भारतीय विमान कंपन्यांना वाढीव संरक्षण देणारा औपचारिक निर्देश जारी करण्याची मागणी केली आहे. पत्रात डीजीसीए आणि सरकारला वैमानिक व विमान कंपनीच्या कर्मचाऱ्यांच्या शौर्य आणि निःस्वार्थतेला औपचारिक मान्यता देण्याचे आवाहन केले आहे. "कर्मचारी प्रचंड धोक्याच्या परिस्थितीत शौर्य आणि निःस्वार्थता दाखवतात. त्यांची 'फ्लाय टू सर्वर' (Fly to Serve) वृत्ती हवाई व्यवसायातील सर्वोत्तम गुणांचे प्रतीक असल्याचे पत्रात नमूद केले आहे.



ANAND RATHI

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड, एक्सप्रेस झोन, ए विंग, ८ वा मजला, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, गोरेगाव (पूर्व), मुंबई – ४०० ०६३ भारत
Mobile: +91 9820648283 | Website: www.rathi.com

ई-लिलाव विक्री सूचना

सर्वसाधारणपणे जनतेला आणि विशेषतः खालील कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदारांना सूचना देण्यात येत आहे की आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड एआरजीएफएल (सुरक्षित कर्जदार) कडे सुरक्षित केलेली खाली वर्णन केलेली अनुसूची स्थावर मालमत्ता कर्ज खाते क्रमांक **APPL00018600** असून त्याचा भौतिक ताबा एआरजीएफएल च्या अधिकृत अधिकाऱ्याने वेबसाइट **https://sarfaesi.auctiontiger.net** द्वारे घेतला आहे, ऑनलाइन ई–लिलावाद्वारे अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या तारखेला, जसे आहे तिथे आहे आणि जसे आहे जे आहे आणि जे काही आहे ते या आधारावर अनुसूचीमध्ये विशेषतः नमूद केलेल्या एकूण रकमेच्या वसूलीसाठी विकली जाईल आणि त्यावरील करारात्मक व्याज आणि इतर खर्च आणि शुल्क जोपर्यंत कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदाराकडून वसुली झाल्याची तारीख खाली नमूद केल्याप्रमाणे:

कर्जदाराचे नावः (१) मे. रुची इंडिया (कर्जदार) ३सी एम्पायर वेज, ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, ठाणे, ठाणे–४००६०४

सह–कर्जदाराचे/कर्जदारांची नावे: (२) श्री बन्सिधर रामकर यादव (सह–कर्जदार) सी–६०२ मोहन आशिष सोसायटी लि. अल्मेडा रोड, टी.एम.सी. ऑफिस समोर, पाचकपाखडी, ठाणे पश्चिम: ४००६०२. (३) सौ. कामावतीदेवी बी यादव (सह–कर्जदार) सी–६०२ मोहन आशिष सोसायटी लि. अल्मेडा रोड, टी.एम.सी. ऑफिस समोर, पाचकपाखडी, ठाणे पश्चिम: ४००६०२. (४) श्री जयप्रकाश यादव (सह–कर्जदार) सी–६०१ मोहन आशिष सोसायटी लि. अल्मेडा रोड, टी.एम.सी. ऑफिस समोर, पाचकपाखडी, ठाणे पश्चिम: ४००६०१. (५) कुसुम यादव (सह–कर्जदार) सी–६०१ मोहन आशिष सोसायटी लि. अल्मेडा रोड, टी.एम.सी. ऑफिस समोर, पंचपखडी, ठाणे पश्चिम: ४००६०१.

मालमत्तेचा पत्ता: फ्लॅट नं. ६०१, सहावा मजला, सी विंग, मोहन आशिष सीएचएसएल, प्लॉट नं. ३९४/डी, रमाबाई आंबेडकर नगर, टी.एम.सी. ऑफिस समोर, संत ज्ञानेश्वर रोड, अल्मेडा रोड जवळ, सीटीएस नं. ६५०, गाव पंचपखडी, सर्वेक्षण नं. २३०–ए, ठाणे (पश्चिम), जिल्हा ठाणे, महाराष्ट्र.

थकलेली रक्कम (मागणी सूचनेनुसार, भविष्यातील व्याज आणि खर्चासह)	रु. १,४३,३९,१६२/– (एक कोटी त्रेचाळीस लाख एकोणचाळीस हजार एकशे बासष्ट रुपये)
लिलावाची तारीख	२४ एप्रिल २०२६
राखीव किंमत	रु.१,७४,७८,०००/– (फक्त एक कोटी चौऱ्याहत्तर लाख अठ्ठ्याहत्तर हजार रुपये)
कमाईची रक्कम ठेव	राखीव किमतीच्या १०%
किमान बोली वाढीची रक्कम	रु.१०,०००/– (फक्त दहा हजार रुपये)
इच्छुक खरेदीदारांसाठी मालमत्तेच्या तपासणीची तारीख आणि वेळ	१७ एप्रिल २०२६ सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यंत
केवायसी कागदपत्रांसह निविदा फॉर्म सादर करण्याची तारीख आणि वेळ / ईएमडीचा पुरावा इत्यादी.	२२ एप्रिल २०२६ केवायसी कागदपत्रांसह दुपारी ४ वाजेपर्यंत
ऑनलाइन ऑफर उघडण्याची तारीख आणि वेळ	२४ एप्रिल २०२६ सकाळी १०:०० ते दुपारी १:०० दरम्यान

टीप: इच्छुक बोलीदार/खरेदीदार आनंद राठी ग्रुपची वेबसाइट **www.rathi.com** ला भेट देऊ शकतात लिलाव प्रक्रियेच्या अटी आणि शर्तींबद्दल तपशीलवार माहितीसाठी.

हे प्रकाशन नियम ८(६) आणि ९(१) ओ सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम, २००२ अंतर्गत वरील कर्जदार/सह–कर्जदार/जामीनदारांना ३० दिवसांची सूचना देखील आहे.

तारीख: २० मार्च २०२६
ठिकाण: मुंबई

आनंद राठी ग्लोबल फायनान्स लिमिटेड
अधिकृत स्वाक्षरीकर्ता